नि.दि.दा. ३१६/२०२४
निशाणी ३२

MHAH230007642024

दत्तात्र्य दिनकर घोडके
वि. बबन दगडू घोडके

# निशाणी ३२ खाली आदेश

प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द विनाकैफियत चा झालेला आदेश रदद करुन मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या म्हणण्याप्रमाणे, दाव्यास कैफियत देण्यास आवश्यक असणारी महत्तवाची कागदपत्रे व माहिती देवुन त्यांना मुदतीत मिळालेला नाही. त्यामुळे ते कागदपत्र व माहिती वकिलांना मुदतीत देवु शकले नाही. दरम्यानच्या काळात वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान तडजोडीची बोलणी चालु झाली होती. त्यामुळे कैफियत देता आली नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्यास परवानगी न दिल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे तरी न्यायालयाच्या दुष्टीने प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे व प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज हा बरोबर नाही. सदर प्रतिवादी हे दिनांक १७.०२.२०२५ रोजी वकिलांमार्फत हजर झालेले आहेत. प्रतिवादी ३ मयुर अशोक घोडके यांनी दावा मिळकतीतील अविभक्त हिस्सयाची विक्री दिनांक २१.०३.२०२५ रोजी केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी याचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

३. सदरचा दावा हा वादींनी प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी, कब्जेसाठी, व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर ते दिनांक १७.०२.२०२५ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांना

पुरेशी संधी देवुनही त्यांनी दाव्यात कैफियत दिली नाही. प्रतिवादी यांचा सदरचा विलंब पाहता प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी प्रत्येकी २००/– रु कॉस्ट वादी यांना देण्याचा अटीवर मंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा निशाणी ३२ वरील अर्ज, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी प्रत्येकी २००/– कॉस्ट वादी यांनी देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.07.30 10:38:34 +0500

**ठिकाण : श्रीगोंदा** **रविंद्र भ. खवले,**

**दि. २८.०७.२०२५** **२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा.**